# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University**

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./पूनर्मूल्यांकन विभाग/२०२४/ 1457 दिनांक : 18 JUL 2024

**परिपत्रक** 42

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य/प्राचार्या व संचालक/विभागप्रमुख, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, **मार्च/एप्रिल-२०२४** या सत्रातील परीक्षा माहे एप्रिल-२०२४ पासून सुरु झालेल्या आहेत. संबंधित विषयाचे निकाल प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी महाविद्यालयामार्फत फोटोकॉपी मिळण्यासाठी अर्ज करतात. त्यास विद्यापीठामार्फत फोटोकॉपी दिली जाते, तद्नंतर विद्यार्थी पूनर्मूल्यांकनासाठी अर्ज करतात त्यांच्या अर्जानुसार त्यांचे पेपर विद्यापीठामार्फत संबंधित शिक्षकांकडून तपासणी करुन घेवून त्यांचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतो.

**मार्च/एप्रिल-२०२४ पासून** पूनर्मूल्यांकनाचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्यानंतर सदर निकालात काही दुरुस्ती/चुका असल्यास निकाल प्रसिध्द केल्यापासून **१५ दिवसाच्या आत** महाविद्यालयामार्फत आवश्यक ती कागदपत्रे जोडून विद्यापीठाकडे सादर करावीत. तद्नंतर विहीत नियमानुसार त्याची तपासणी/शहानिशा करुन सदरचा निकाल पुढील लॉटमध्ये सुधारीत करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. **विहीत दिवसानंतर** आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

याची सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील संचालक/विभाग प्रमुख, यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. व सदरचे परिपत्रक प्राचार्य/संचालक यांनी शिक्षक, विद्यार्थी, पालक व परीक्षेशी निगडीत सर्व घटकांच्या निदर्शनास आणावे.

(डॉ. श्रीकांत ग. अंधारे)
**संचालक**

******